आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

८ ऑक्टोबर २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीत काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्स आघाडीला तर हरियाणात भाजपाला स्पष्ट बहुमत,

- शेअर बाजारातली आठवडाभर सुरू असलेली घसरण थांबली

- राज्यातल्या दहा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचं उद्या प्रधानमंत्र्याच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्घाटन

  **आणि**

- ७०व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचं राष्ट्रपतींच्या हस्ते नवी दिल्लीत वितरण, ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके जीवनगौरव पुरस्कार प्रदान/ सोहिल वैद्य,सुमंत शिंदे, सचिन सूर्यवंशी सन्मानित

**<><><><><>**

**जम्मू आणि काश्मिर** तसंच हरियाणा विधानसभा निवडणूकीची मतमोजणी आज झाली.

जम्मू काश्मीरमधे ९० विधानसभा मतदारसंघापैकी ४२ ठिकाणी नॅशनल कॉन्फरन्सचे उमेदवार विजयी झाले असून भाजपाचे उमेदवार २९ ठिकाणी विजयी झाले आहेत. काँग्रेस ६, पीडीपी ३ तर जेपीसी, सीपीएम आणि आपचे उमेदवार प्रत्येकी एका ठिकाणी विजयी झाले आहेत. सात ठिकाणी अपक्ष उमेदवारांनी विजय मिळवला आहे. माजी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला बडगाम आणि गंदेरबाल या दोन्ही मतदारसंघातून विजयी झाले आहेत.

**हरियाणात** ९० मतदारसंघांपैकी ४२ ठिकाणी भाजपा उमेदवार तर ३४ ठिकाणी काँग्रेस उमेदवार विजयी झाले आहेत. भारतीय लोकदलाचे उमेदवार दोन

ठिकाणी तर अपक्ष उमेदवार तीन ठिकाणी विजयी झाले आहेत. ९ मतदारसंघांपैकी ३ ठिकाणी काँग्रेसचे आणि ६ ठिकाणी भाजपचे उमेदवार आघाडीवर आहेत. कुस्तीपटू विनेश फोगाट जुलाना मतदारसंघातून काँग्रेसकडून विजयी झाल्या आहेत. तसंच मुख्यमंत्री नायबसिंग सैनी हे लडवा मतदारसंघातून विजयी झाले आहेत.

**<><><><><>**

हरयाणामधे जातीय वादाचा पराभव आणि विकासाचा विजय झाला असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाजमाध्यमावर दिली आहे. तिथल्या जनतेनं डबल इंजिन सरकारवर विश्वास व्यक्त केला असून, या यशाचं निर्विवाद श्रेय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपा अध्यक्ष जे पी नड्डा यांना जातं, असं त्यांनी म्हटलय.

हरियाणा विधानसभा निवडणुकीत मतदारांनी विकासाला महत्व दिल्याच दिसून आलं, असं राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल्ल पटेल यांनी म्हटलंय. काँग्रेसनं लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याचा उपयोग झाला नाही. जम्मू काश्मीरमध्ये काँग्रेसला मिळालेलं यश नॅशनल कॉन्फरन्सच्या मदतीनं मिळालं आहे. उलट जम्मू क्षेत्रात भाजपाची ताकद वाढली आहे, असं ते म्हणाले.

हरियाणामधे भाजपाला मिळालेल्या यशाबद्दल मुंबईतल्या प्रदेश कार्यालयात भाजपा नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वाखाली जल्लोष साजरा करण्यात आला.

दरम्यान, उमर अब्दुल्ला हे नव्या आघाडी सरकारचे मुख्यमंत्री असतील, असं  नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष फारुक अब्दुल्ला यांनी जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकांच्या निकालाचे सकारात्मक परिणाम आज देशातल्या शेअर बाजारांवर झाले. त्यामुळं आठवडाभरापासून सुरू असलेली घसरण थांबली. दिवसअखेर सेन्सेक्स ५८५ अंकांनी वधारुन ८१ हजार ६३५ अंकांवर बंद झाला. निफ्टी २१७ अंकांची तेजी नोंदवून २५ हजार १३ अंकांवर स्थिरावला. सरकारी क्षेत्रातल्या कंपन्यांच्या समभागात आज तेजी होती.

**<><><><><>**

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर उद्या सकाळी पतधोरण आढावा जाहीर करणार आहे. समितीची बैठक कालपासून मुंबईत सुरू झाली. यावेळीही रिझर्व्ह बँक व्याज दर जैसे थे ठेवण्याची अपेक्षा विविध अर्थतज्ज्ञांनी वर्तवली आहे. यंदाही हे दर कायम राहिले तर सलग दहाव्यांदा बँकेकडून व्याजदर जैसे थे राहतील.

**<><><><><>**

राज्यात महाविकास आघाडीचं सरकार आल्यास मुख्यमंत्री कोण असेल ते जाहीर करावं अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी आज पुन्हा केली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे मुंबईत आयोजित वज्र निर्धार परिषदेत ते बोलत होते. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार जाहीर करावा आपण त्याला पाठिंबा देऊ असं ते म्हणाले.

**<><><><><>**

राज्यातल्या सर्व उपसा सिंचन योजनांसाठी सौरऊर्जीकरण करण्यात येणार असून त्यासाठी केंद्र सरकारने राज्य सरकारला २९ हजार कोटींचा निधी मंजूर केल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. सोलापूर इथं लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळ्याला संबोधित करताना फडनवीस बोलत होते. आतापर्यंत

पहिल्या टप्प्यात १२ हजार कोटी तर दुसऱ्या टप्प्यात ३ हजार कोटी रुपयांची कामं मंजूर झाली आहेत ,असं फडनवीस म्हणाले.

<><><><>

तळागाळातल्या नागरिकापर्यंत आरोग्य सुविधा पुरवण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितलं. नागपूर इथं एम्स अर्थात अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला ते संबोधित करत होते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात विद्यार्थी संख्या वाढवण्याच्या निर्णयाचाही त्यांनी यावेळी पुनरुच्चार केला.

<><><><>

राज्यातल्या १० नव्या शासकीय महाविद्यालयांचं उद्घाटन उद्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे होणार आहे. मुंबई, अंबरनाथ, नाशिक, जालना, बुलडाणा, हिंगोली, वाशिम, अमरावती, भंडारा आणि गडचिरोलीमध्ये ही महाविद्यालयं आहेत. राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीसह केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी.नड्डा, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांसह वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ हे देखील या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहे.

<><><><>

भौतिकशास्त्रातला यंदाचा नोबेल पुरस्कार जॉन जे. हॉपफिल्ड आणि जेफ्री ई. हिंटन या वैज्ञानिकांना जाहीर झाला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता विकासासाठी यांत्रिक शिक्षणात केलेल्या संशोधनाबद्दल हा पुरस्कार त्यांना मिळाल्याचं रॉयल स्वीडीश अकॅडेमी ऑफ सायन्सेसने जाहीर केलं आहे. जॉन हॉपफिल्ड यांनी प्रतिमा आणि

इतर विदा प्रणाली साठवून ठेवण्याकरता संलग्न मेमरीची निर्मिती केली आहे. उपलब्ध माहितीतून वैशिष्ट्यं ओळखून काढून प्रतिमांमधून ते शोधण्याची कृत्रिम बुद्धिमत्तेची पद्धत जेफ्री हिंटन यांनी तयार केली आहे. या दोन्ही संशोधकांनी भौतिकशास्त्रातल्या पद्धती आणि संकल्पनांचा वापर या निर्मितीत केला.

<><><><><>

चित्रपटसृष्टीतल्या सर्वात प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या दादासाहेब फाळके जीवनगौरव पुरस्काराने आज ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांचा सन्मान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते झाला. ७०व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार वितरण सोहळ्यात राष्ट्रपतींनी इतरही कलाकार आणि चित्रपटांना सन्मानित केलं. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन आणि इतर यावेळी उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना राष्ट्रपतींनी दादासाहेब फाळके जीवनगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल मिथुन चक्रवर्ती यांचं अभिनंदन केलं. चित्रपटसृष्टीला त्यांनी दिलेल्या योगदानाचा उल्लेख त्यांनी केला. तसंच, राष्ट्रीय पुरस्कार पटकावलेल्या चित्रपटांमुळे समाजात सकारात्मक बदल घडून येतील, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली. अश्विनी वैष्णव यांनी चित्रपट व्यवसायाच्या प्रगतीसाठी सरकार करत असलेली कामं अधोरेखित केली.

कथाबाह्य चित्रपट विभागात सर्वोत्कृष्ट माहितीपटाचा पुरस्कार आदिगुंजन या मराठी माहितीपटासाठी सोहिल वैद्य यांना, तर सर्वोत्कृष्ट निवेदनाचा पुरस्कार याच माहितीपटासाठी सुमंत शिंदे यांना देण्यात आला. सर्वोत्कृष्ट कला आणि संस्कृती आधारित चित्रपट म्हणून सचिन सूर्यवंशी यांच्या वारसा या मराठी माहितीपटाला गौरवण्यात आलं. तर आणखी एक मोहेंजोदारो हा मराठी माहितीपट सर्वोत्कृष्ट चरित्रपटात्मक/ऐतिहासिक पुनर्निर्माण/ संकलित चित्रपट ठरला.

कथाधारित चित्रपट विभागात परीक्षक विशेष उल्लेख पुरस्कार गुलमोहर या चित्रपटासाठी मनोज वाजपेयी यांना प्रदान करण्यात आला. कथात्मक चित्रपट विभागात 'पोन्नियिन सेल्वन भाग १'नं वर्चस्व गाजवलं. 'तिरुचित्रमबलम' या चित्रपटासाठी नित्या मेनन आणि 'कच्छ एक्सप्रेस' या चित्रपटासाठी मानसी पारेख या दोघींना सर्वोत्कृष्ट नायिका म्हणून गौरवण्यात आलं. 'कांतारा' या कन्नड

चित्रपटासाठी रिषभ शेट्टी याला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार देण्यात आला. तर 'ऊँचाई' या चित्रपटासाठी सूरज बडजात्या यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार राष्ट्रपतींनी प्रदान केला.

**<><><><><>**

राज्य सरकारनं २०२४ या वर्षासाठी आयोजित केलेल्या उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या स्पर्धेत परभणीच्या भारतमाता गणेश मंडळानं पहिला क्रमांक पटकावला. ठाण्याचं जय भवान मित्र मंडळ द्वितीय आणि लातूरचं वसुंधरा वृक्षरुपी गणेश मंडळाला तिसरा क्रमांक मिळाला.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी, पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.